सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र

एप्रिल-२०२२ वर्ष -३, अंक-६

**कार्यालय** - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

या अंकात . . . . .

१. धुळे शाखेची सन २१-२२ ची वार्षिक सभा संपन्न ...१
२. धुळे शाखेचा विशेष उपक्रम .........१
३. कार्यकारी मंडळ बैठक वृत्त. ...........२.
४. नवी लेख मालिका......... २
श्री. विठ्ठल पत्की: सेवक संघाचे सेनापती

## सेवक संघ विशेष वृत्त.

### धुळे शाखेची सन २०२१-२२ ची वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न

से.व.क. संघ धुळे शाखेची सन २०२१-२२ साठीची वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक १७-४-२०२२ रोजी सकाळी ११ वाजता वन विश्राम गृह, वन विभाग कार्यालय परिसर, धुळे येथे मोजक्या सदस्यांचे उपस्थितीत संपन्न झाली. अनेक सदस्य वेगवेगळ्या ऐनवेळी त्यांना उद्भवलेल्या कामामुळे उपस्थित राहू शकले नाही. तथापि, अशा पार्श्वभूमीला रुपेरी किनार असल्याची प्रचिती श्री. सी.एस. पाटील (दररोज सकाळी सुविचार पाठवणारे) हे सकाळी हैदराबाद येथून विमानाने औरंगाबाद , तेथून कारने पारोळा, व पारोळा येथून धुळे येथे, बुलेट मोटार सायकलने सभेसाठी आले होते. धुळे शाखेचे अध्यक्षांनी श्री. पाटील यांचे सेवक त्यांच्या संघाबद्दलच्या सच्च्या आत्मियतेबद्दल विशेष कौतुक केले. सभेचे अध्यक्षस्थानी श्री. एस. के. गवळी होते.

सभेचा अजेंडा

(१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे

(२) धुळे शाखेने सन २०२१-२२ या वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेणे .

(३) धुळे शाखेचे सन २०२०-२१ चा सेवक संघाचे नियुक्त सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला वार्षिक जमा-खर्च मांडणे

(४) धुळे शाखेचे सदस्य नोंदणीचा आढावा घेणे.

५) धुळे शाखेचे सन २०२१-२२साठी वार्षिक कार्यक्रम, धोरण व अंदाज पत्रक ठरविणे


(६) उत्कृष्ठ कामाबद्दल वन कर्मचारी व सेवक सदस्य यांचा सत्कार.

(७) आयत्या वेळचे विषय.

### धुळे शाखेचा विशेष उपक्रम वन कर्मचारी व सेवक सदस्य यांचा सत्कार.

श्री.नानासाहेब लडकत, वन संरक्षक सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, यांचा सभेदरम्यान सेवक संघाच्या वतीने सन्मान पत्र, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यांनी वयाच्या साठाव्या वर्षी, प्रवासाच्या शासकीय सुविधांचा त्याग करत,पुणे ते कोल्हापूर असा २६० किमी असा प्रदीर्घ सायकल प्रवास करून नवीन नेमणूक ठिकाणी हजर होऊन वन विभागात सर्व प्रथम जो आदर्श निर्माण केला आहे व त्यातून प्रेरणा देणारे काम केले आहे. त्यापित्यर्थ सेवक संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सत्कार केला. श्री. लडकत वन संरक्षक यांनी केलेली सायकलींग ही वन सेवेसाठी व त्या अनुषंगाने केली, म्हणून त्याबद्दल दखल घेण्यात . अनेक वृत्तपत्रांनी देखील या घटनेची दखल घेउन प्रसिध्दी दिली होती.












श्री. उमेश धोपेश्वरकर, पुणे सेवक संघाच्या मुख्यालयी केवळ सायकल वापरून सेवक संघाच्या कामात जे भरीव योगदान देत आहेत व आत्मियतेने सेवाभावाचा परिचय देत आहेत. त्याप्रित्यर्थ, दि १७-४-२२ रोजी सेवक संघाच्या वतीने वार्षिक सर्वसाधारण सभेत धुळे येथे त्यांचा सन्मान पत्र, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्याचे ठरले होते व त्यांना आमंत्रित केले होते. पुणे परंतु, ते वैयक्तिक व्यस्ततेमुळे उपस्थित राहू शकले नाहीत.



सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र
धुळे शाखा, धुळे

सन्मान पत्र

श्री. उमेश धोपेश्वरकर, विभागीय व्यवस्थापक (सेनि).

आपण सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र या सेवाभावी संस्थेच्या सह-कोषाध्यक्ष पदावर नियुक्त असून संस्थेची पुणे मुख्यालयातील विविध कामे अतिशय मेहनतीने व समर्पित वृत्तीने करत आहात. ते करत असतांना आपण केवळ मात्र सायकल या वाहनाचा वापर करून इतरांसमोर जो पर्यावरण संवर्धनाचा आदर्श ठेवत अखंड सामाजिक योगदान देत आहात, त्याप्रित्यर्थ, आपणास, सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ (सेवक) महाराष्ट्र, धुळे शाखेतर्फे वार्षिक सभा २०२२ प्रसंगी हे सन्मान पत्र देवून गौरविण्यात येत आहे.

धुळे
दिनांक- १७ एप्रिल २०२२

(एस. के. गवळी)
अध्यक्ष
सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र
धुळे शाखा, धुळे

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र - रौप्य महोत्सवी वर्ष - २०२२

******************************

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाची बैठक दि.६-४-२०२२ होउन खालील विषयावर चर्चा झाली.

१.रौप्यमहोत्सवी सोहळ्याचा जमा-खर्च आढावा-श्री उमेश धो.
2.मानचिन्हे व अंकांचे वितरण प्रगती-श्री. मदन कुलकर्णी.
3."माधवाची वनयात्रा" शिल्लकी पुस्तकांची विल्हेवाट-श्री.पत्की.
4.कन्हारगाव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा मंजूरी बाबत प्रगती-श्री.भगत.
5.सांगली जिल्ह्यातील वनसंपदेचा मागोवा व ग्रंथसंग्रह तयार करणे--श्री.पी.बी.धानके.
6.आश्वासित सेवा प्रगती योजनेचा लाभ देण्यास दिरंगाई बाबत पाठपुरावा करणे-श्री.पत्की
7.वनप्रबोधनी,चंद्रपूर यांचेशी क्षेत्रीय वनकर्मचारी/अधिकारी यांचे प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत समझोता करणे-श्री.जगताप.
8.नवीन कामे शोधणे-श्री अस्थाना व श्री कुलकर्णी.
9.ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.

----------------oooo------------

-----------------------------------

## लेख मालिका

जानेवारी २०२२ अंकापासून "सेवक संघाचे सेवेकरी " ही नवी लेख मालिका सुरू करणेत आली आहे. यात सेवक संघाचे जडणघडणीत गेल्या २५ वर्षात ज्या सदस्यांनी मोलाचे योगदान दिले, त्यांच्या कामाबाबत ओळख करून देण्यात येत आहे.

त्याअंतर्गत लेख

### श्री. विठ्ठल पत्की: सेवक संघाचे सेनापती

-संभाजी गवळी

आपण पाहतो की, स्वयंसेवी संस्था स्थापन आजकाल फारच आवडता धंदा झाला आहे. कुणीही उठावं आणि सरळ स्वयंसेवी संस्था कागदोपत्री स्थापन करावी व गाजावाजा करावा असे सरसकट दृश्य आहे. पण ती स्वयंसेवी संस्था संगठीत ठेवणे, सक्षमपणे चालवणे, सतत क्रियावान ठेवणे, कारभार पारदर्शीपणे सांभाळणे व ठोस स्वरूपात शासन उपयोगी, समाजहितेषी सेवा देणे हे मोठे दिव्य कार्य आहे.ही एक अति अवघड कसोटी आहे.

आज मितीस या रौप्य महोत्सवी स्मरणिका विशेष अंकासाठी ह्या लेखप्रपंचाचे कारण असे की, अजून २५ वर्षानंतर जेंव्हा सेवानिवृत्त वनकर्मचारी संघाची ५० वर्षे पूर्ण होतांना सुवर्ण महोत्सवाच्या अवलोकन प्रसंगी सेवानिवृत्त वनकर्मचारी संघाच्या गतकाळातील जडण-घडण, वाटचाल, यशापयश याचा उहापोह होईल, तेंव्हा ह्या लेखाची उपयुक्तता राहीन. पुढील अनेक वर्षे ही स्मरणिका सेवक संघाच्या घडामोडींचा संदर्भ ग्रंथ म्हणून हाताळली जाईल, ही बाब लक्षात घेता उद्यासाठी अक्षरदान करणे अगत्याचे ठरत आहे.



"सेवक संघ" या लघु नावानेही ओळखल्या जाणा-या "सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र", या पर्यावरण, वन व वन्यजीव विषयक तांत्रिक सेवा पुरविणा-या स्वयंसेवी संस्थेने महाराष्ट्र राज्यात सतत गेली २५ वर्षे शास्त्रशुध्दरित्या वन व वन्यजीव आणि संलग्न क्षेत्रात भरीव, कार्य करत आज सन २०२२ मध्ये रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करून मानांकन प्राप्त केले आहे.

इतिहास निर्माण केला आहे. सेवक संघ व त्याच्या कामास तोड नाहीच.

आपण सभोवताल पाहिले असता असे दिसते की स्वयंसेवी संस्था स्थापन करून व तिचे काम जेमतेम काही दिवस चाल चालवून स्वतःची पाठ थोपटून घेणारे अनेक महाभाग आहेत. अलीकडे तर असे दिसेल की कुणीही उठावं आणि कुठली तरी संस्था स्थापन करावी काही दिवस चालू राहाते आणि नंतर पुढे त्याचा तपास लागत नाही. कुठलीही संस्था अथवा संघटन स्थापन करणे, ते चालवणे व त्याच्या कार्याद्वारे कामे करून शासनाच्या व समाजाच्या उपयोगी पडणे हे काम सोपे नाही.

त्यात मोठ्या प्रमाणात सातत्य, मेहनत, समाजसेवेची कास आणि समाजाला आपण काहीतरी देणे लागतो याची जाणीव आणि त्यासाठी वैयक्तिक त्याग यासारख्या अनेक गोष्टींचा मिलाफ होणे गरजेचे असते.

सेवक संघाच्या बाबतीत मात्र एक प्रभावी कार्याचा, व्यवस्थापन कौशल्याचा इतिहास आढळून येतो. तसे पाहिले तर सेवानिवृत्ती नंतर बहुतांश निवांतपणे आपले आयुष्य जगण्याचा मानस ठेवून असतात. परंतु सेवा निवृत्त कर्मचारी संघात मात्र सेवानिवृत्ती उपर असलेल्या आयुष्याचे योगदान देणारे अनेक जण असले तरी, त्यात श्री. विठ्ठल त्र्यंबक पत्की यांचा वाटा फार फार मोठा आहे. आपल्या जबरदस्त बौध्दिक ताकदीच्या कसाने आणि कठोर व चैतन्यशाली व्यक्तिमत्वाने त्यांची कार्यकारी अध्यक्ष पदाची कारकिर्द ही सेवक संघाचे इतिहासात लख्ख झगझगाट करून गेली. श्री. पत्की ही केवळ संघातील सदस्य नाही, समस्त वन विभागातीस जुन्या जाणत्या जणांच्या मनात कर्तगगार अधिकारी आजीवन ठाण मांडून बसलेली ती एक अविस्मरणीय कथा आहे. आणि पुढेही राहीन.

वाचकहो, या लेखाचे शीर्षक "श्री. विठ्ठल पत्की : सेवक संघाचे सेनापती" असे दिले आहे. एका वेगळ्या कृतज्ञतेच्या भूमिकेने देण्यामागचे कारणच असे की त्याच्या नेतृत्वाला नाकारताच येणार नाही. ज्यावेळेस अजून पंचवीस वर्षांनी सेवक संघ सुवर्ण महोत्सव साजरा करेल,यावेळेस निश्चितपणे सेवक संघाची शक्तिस्थळे याचा निश्चित मागोवा घेतला जाईल आणि त्यावेळेस श्री. पत्की यांच्या कामाचा सेवक संघाच्या कामाची ठळकपणे आहे त्याची दखल घ्यावी लागेल.सन २००६ नंतरचे सेवानिवृत्ती उपर त्यांच्या गेल्या पंधरा वर्षात दिलेल्या योगदानाला तोड नाही.

श्री. पत्की ही एक स्वतंत्र विचाराची व्यक्ती. सेवक संघाच्या या रोप्य महोत्सवाच्या वर्षात श्री पत्की यांना सेवानिवृत्त होऊन पंधरा वर्षे झालेली आहेत व त्यांची वय ७५ वर्षाचे असताना ते ज्या धडाडीने आणि ज्या उत्साहाने त्यानी सेवक संघाच्या कामात सहभागी होऊन सेवक संघाच्या इतर सदस्यांना सोबत घेऊन विविध कामे केली आहेत. त्यास तोड नाही असेच दिसते. त्यांच्या सेवाकाळामध्ये त्यांनी वन विभागात आपल्या प्रशासनाची शिस्तीची कार्यपद्धतीची जी खास छाप सोडली होती, तसेच जो अधिकारी आणि सर्वसामान्य कर्मचाऱ्यांमध्ये आदर्श निर्माण केला होता किंवा त्यांच्या शिस्तीचा जो एक अनुकरणीय आदरयुक्त दरारा निर्माण केला होता त्याची झळाली अद्यापही सेवानिवृत्तीउपर पंधरा वर्षे कालावधी पर्यंत टिकून आहे. त्यामुळेच त्यांच्याकडे मोठ्या कृतज्ञतेने पाहणारा मोठा असा सेवारत अधिकारी वर्ग वन विभागात आहे, हे इथे नमूद करणे आवश्यक आहे. त्याच्या प्रेरणेने गेल्या पाच वर्षात जेव्हापासून मी या सेवक संघाच्या कार्यात समाविष्ट झालो. त्यांच्या सक्षम पुढाकाराने सतत काही ना काही समंत्रकीय कामे राज्य स्तरावर घेण्यात आली. त्या व्यतिरिक्त त्यांच्याच प्रेरणेनेच वृत्त स्तरावर देखील अनेक कामे करण्याची स्फूर्ती धुळे वृतात तरी निश्चित प्राप्त झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली सेवक संघाने राज्य स्तरावर कॅम्पाअंतर्गत रोपवनांचे मूल्यांकन, वन विकास यंत्रणां अंतर्गत अनेक रोपवने व इतर योजना अतर्गत कामांचे मूल्यांकन, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या बांबू लागवड योजनांर्गत रोपे मोजणी, राज्य वन प्रशिक्षण संस्थांसाठी १६ विषयांची क्रमिक पुस्तके निर्मिती

यासारखी विस्तृत व राज्यव्यापी कामे करून त्याचे परिपूर्ण अहवाल वेळेत संबंधित अधिका-यांना सादर केले आहेत. त्याशिवाय यापूर्वी अभिलिखित कधीही न करण्यात आलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सघन बांबू फुलो-याच्या पार्श्वभूमीवर बांबू निष्कासन व्यवस्थापन अहवाल तयार करून तो राज्य शासन, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय वन्यजीव सल्लागार मंडळास व राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणास सादर करून एक इतिहास रचला आहे. त्याशिवाय गतवर्षी अधिघोषित करण्यात कन्हारगाव अभयारण्याचा वन्यजीव व्यवस्थापन आराखडा प्रथमत:च महाराष्ट्रात सेवक संस्थेकडून तयार करण्यात आला. त्या व्यतिरिक्त वन विभागाबाहेर पुणे जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनांतर्गत कामाचे मूल्यांकन करणे, संत तुकाराम योजनेचे स्पर्धेसाठी मूल्यांकन, पुणे महा नगर पालिकेसाठी वनीकरणाविषयी कार्यशाळेचे आयोजन, निवृत्त वनकर्मचा-यांच्या सेवानुभवाचा, व्यावसायिक कौशल्याचा व त्यांच्या अंगच्या विविध गुणांचा उपयोग करून घेउन पर्यावरण संवर्धनाचे विविध कार्यक्रमांचे राबविणे,सेवानिवृत्त वन कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांच्या काही समस्या असतील तर त्यांची सोडवणूक करण्यास मदत करणे. असे उपक्रम होत राहिले. या बाबी म्हणजे श्री पत्की सर यांच्या अनुभवाला मिळालेली दाद म्हणावा लागेल. सेवेत कार्यरत असताना कोणीही अधिकारी आपल्या अधिकाराचा व शक्तीचा वापर करून इतरांकडून व कनिष्ठांकडून सर्व कामे सहजपणे करून घेऊ शकतो. तथापि सेवानिवृत्ती उपर हे सर्व काही संपलेले असते अशा परिस्थितीत आपल्या सहकाऱ्यांना एकत्र येऊन अशी आगळीवेगळी विविध कामे करण्यास केवळ आणि केवळ त्यांचे वैयक्तिक कौशल्य, स्नेह, संबंध केवळ उपयोगी पडतात, त्याचे श्री. पत्की सर हे एक उत्तम उदाहरण आहे. सेवक संघाचे अनेक सदस्य म्हणजे ही निसर्गाच्या सेवेसाठी तांत्रिक सेवा देणारी एक सेना म्हटले आणि त्यास नेतृत्व देणारे श्री पत्की हे आगळे वेगळे सेनापती आहेत.

आज मितीस २०२१ मध्ये मला वनविभागातून विभागीय वन अधिकारी या पदावरून सेवा निवृत्ती उपर पाच वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. सेवानिवृत्ती नंतर आयुष्याचा लाभलेला काळ उत्पादकशील तसेच नाविन्यपूर्ण कामासाठी आणि इतरांना सतत उपयोगी पडण्यासाठी सत्कारणी लागावा याच्या शोधात असतांना सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र या स्वयंसेवी संस्थेचा किनारा दिसला. या संघांमध्ये मी प्रथमत: वार्षिक सदस्य म्हणून धुळे शाखेत सहभागी झालो. सुरुवातीच्या वर्षाच्या कालावधीत सेवानिवृत्त कर्मचारी संघा मार्फत राज्यभरात होत असलेल्या कामाची ओळख झाली. तसेच जाणीवपूर्वक या संस्थेच्या गेल्या दोन दशकांहून अधिकतम कालावधीच्या कार्याची सखोलपणे माहिती घेतली असता श्री. पत्की यांच्यासारखा सत्संग लाभणार हे समजले. त्यावरून सेवानिवृत्ती काळ निश्चितपणे सत्कारणी लागेल अशी खात्री झाली आणि त्यानंतर त्याच्या पुढील वर्षी सेवक संघाचे आजीवन सदस्य तो स्वीकारले. पुढे सेवक संघ धुळे शाखेचे अध्यक्षपद, सेवक संघ महाराष्ट्र उपाध्यक्षपद अशा जबाबदा-या मिळाल्या. आणि आयुष्य सत्कारणी लागल्याचे फार मोठे समाधान लाभले.पुढे सेवक संघातील कार्यरत असलेल्या जुन्या वरिष्ठ अनुभवी सेवानिवृत्त सदस्यांशी संपर्क वाढत राहिला व त्यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागात विविध प्रकारची समंत्रक कामे घेण्यास सुरुवात केली. तसेच राज्य स्तरावर होत असलेल्या सेवक संघाच्या कामांत सहभागी पुण्ययोग येत गेला. त्यातून राज्यात फिरण्याचा व वनविभाशी पुन्हा नाळ जोडता आली. त्यासाठी उर्जास्त्रोत ठरणा-या श्री. पत्की सर अशा या आमच्या सेनापतीस त्रिवार वंदन.

----------oooo------------------

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी